फडणवीस, प्रफुल्ल पटेल, शिंदे अन् हसन मुश्रीफ एकत्र येऊ शकतात, तर ठाकरे बंधू एकत्र आल्यास तुम्हाला काय पोटदुखी; राऊतांचा मुख्यमंत्र्यांवर पलटवार >> पान 2

आरोपीचे फोटो सर्वच नेत्यांसोबत, सुरेश धस यांच्याकडून संदीप क्षीरसागरांची पाठराखण >> पान 3

ढगफुटीने शेतीच नव्हे तर आयुष्य उद्ध्वस्त केले >> पान 4

**सुविचार**

जीवनात तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 289 ■ मंगळवार, दि. 01 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मी बोटॉक्सच्या विरोधात.... शेफाली जरीवालाच्या निधनानंतर करिना कपूरचं स्टेटमेंट व्हायरल

आतील पान

# हिमाचलमध्ये अतिवृष्टी; १२९ मार्ग बंद, ३९ मृत्यू

## भूस्खलनानंतर बोगद्यात वाहने अडकली; बिहारमध्ये वीज कोसळून ५ ठार

**हिमाचल प्रदेशात : हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ वरील वाहनांची वाहतूक थांबली आहे. पावसाळ्यापासून आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत.**





दुसरीकडे, बिहारमधील भोजपूर, बक्सर आणि नालंदा येथे वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला. त्याच वेळी रविवारी गया येथील इमामगंज येथील लागुरही धबधब्यात अचानक पाणी वाढले. जोरदार प्रवाहात ६ मुली वाहून गेल्या. स्थानिक लोकांनी सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पाऊस पडेल. उत्तराखंड आणि झारखंडमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्य प्रदेश-राजस्थानसह १२ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे तर १७ राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आहे.

दरम्यान, हिमाचल प्रदेशातील शिमला येथे पाच मजली इमारत कोसळली. येथील भट्टाकुफर येथे ही दुर्घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. धोका लक्षात घेता इमारत आधीच रिकामी करण्यात आली होती.

चार लेनच्या कामामुळे ही इमारत धोक्यात आली होती. शिमलाच्या अनेक भागात भूस्खलन आणि रस्ते बंद झाल्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले. रामपूरच्या सिकेसारी गावात ढगफुटीमुळे गुरे वाहून गेली. चमियाना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे जाणाऱ्या मार्गावर असलेल्या मथू कॉलनीतील एक इमारत कोसळली. तथापि, कोणतीही जीवितहानी झाली नाही, कारण जिल्हा प्रशासनाने गंभीर धोका ओळखून आधीच इमारत रिकामी केली होती. जवळच्या इतर दोन इमारतींनाही धोका आहे.

मुसळधार पावसामुळे सिरमौर जिल्ह्यातील गिरी-जाटोन धरण आणि मंडी जिल्ह्यातील पांडोह धरणातून पाणी सोडण्यात आले आहे, ज्यामुळे गिरी आणि बियास नद्यांची पाणी पातळी धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे. सखल भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार पावसाच्या इशाऱ्यामुळे, कुल्लू जिल्ह्यातील कांगडा, मंडी, सिरमौर आणि बंजर आणि मनाली उपविभागातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

## 'विजयी रॅलीत मनसेनेदेखील सहभागी व्हावे,' आदित्य ठाकरेंचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** त्रिभाषा सूत्रीचा शासन निर्णय मागे घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी चहापानाच्या कार्यक्रमादरम्यान जाहीर केले. त्यामुळे आता पाच जुलै रोजी होणारा सर्वपक्षीय मोर्चा टाळण्यात आला असला तरी पाच जुलै रोजी विजय रॅली निघेल, असे उद्धव ठाकरेंनी रविवारी मातोश्री येथे पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केले. त्यामुळे आता शिवसेनेकडून करण्यात येणाऱ्या या विजयी रॅलीत मनसे सहभागी होणार आहे. आज विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी याचे पडसाद पाहायला मिळाले.

काँग्रेससह शरद पवार यांनीदेखील पाठिंबा : पाच जुलै रोजी होणाऱ्या हिंदी सक्ती विरोधातील मोर्चा निमित्ताने ठाकरे बंधू पहिल्यांदाच एखाद्या राजकीय मंचावर एकत्र येणार होते. याला काँग्रेससह शरद पवार यांनीदेखील पाठिंबा दिला होता. आता उद्धव ठाकरे यांनी विजयी रॅली पाच जुलै रोजी होईल, असे जाहीर केले असताना महाविकास आघाडीदरम्यान एकत्र दिसणार आहेत.

## राज ठाकरेंची मोठी घोषणा: ५ तारखेला मोर्चा नाही, आता होणार 'विजयी मेळावा'!

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी माणसाच्या एकजुटीचा मोठा विजय झाला. इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीने लादण्याचा सरकारचा प्रयत्न मराठी एकजुटीने हाणून पाडला, असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबईत जाहीर केले. या विजयामुळे येत्या ५ तारखेला नियोजित असलेला मोर्चा आता निघणार नाही, त्याऐवजी विजयी मेळावा होणार आहे, असे ते म्हणाले.

हिंदी सक्तीचा अध्यादेश मागे घेतल्याच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, ''हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विजय आहे आणि त्याबद्दल तमाम मराठी जनांचं मनापासून अभिनंदन. ५ तारखेचा हा मेळावा कोणत्याही पक्षाचा झेंडा नसलेला, फक्त मराठी माणसाचा मेळावा असेल.'' या विजयी मेळाव्याचे तपशील लवकरच जाहीर केले जातील, असंही त्यांनी सांगितले.

राज ठाकरे पुढे म्हणाले, ''हा काही श्रेयवादाचा विषय नाही. पण जेव्हा हा विषय समोर आला, तेव्हा आम्ही त्याला तीव्र विरोध केला.'' त्यांनी यापूर्वी पाठवलेली तिन्ही पत्रं वाचून दाखवली आणि सांगितलं की, ''आम्हाला उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी, काँग्रेस यांनीही पाठिंबा दिला. ५ तारखेला जर हा मोर्चा निघाला असता, तर तो 'न भूतो न भविष्यती' असा झाला असता, संयुक्त महाराष्ट्राच्या काळाची आठवण झाली असती आणि सरकारला मराठी माणसाची ताकद कळाली असती.''

## उद्धव ठाकरेंचे बेगडी मराठी प्रेम, खासदार राणेंची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री असताना हिंदी सक्तीचा जीआर काढणारे उद्धव ठाकरे आता झोपेचं सोंग घेत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाठोपाठ खासदार नारायण राणे यांनीही उद्धव ठाकरेंवर सडकून टीका केली आहे. उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम बेगडी आहे. राजकीय स्वार्थासाठी उद्धव 'म राठी प्रेम' दाखवत आहेत. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम कुठे गेले होते ? मराठी माणसाच्या नोकरी, व्यवसायासाठी, पोटाच्या प्रश्नासाठी उद्धव ठाकरेंनी काय केले ? मराठीच्या नावावर फक्त स्वत:चे कल्याण करुन घेतले. मराठी माणसाच्या आणि मराठी भाषिकांच्या कल्याणाचे काय ? असा प्रश्न खासदार नारायण राणे यांनी उपस्थित केला आहे.महाराष्ट्राची राजधानी असूनही मुंबईत मराठी माणसाची टक्केवारी १८ पर्यंत खाली घसरली आहे. याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न खासदार नारायण राणे यांनी उपस्थित केला आहे. मागील दोन दशकांपेक्षा जास्त काळापासून मुंबई महापालिकेत ठाकरेंची सत्ता आहे. पण याच काळात मुंबईतून मराठी माणूस हळू हळू हद्दपार होऊ लागला.

## भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचा अर्ज दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदाची विद्यमान कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. युवा मोर्चाचा सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय प्रवास सुरु केलेल्या श्री. चव्हाण यांना संघटनेच्या कामाचा मोठा अनुभव असल्याने ते प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी ताकदीने पार पाडतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषदेचे अधिवेशन उद्या १ जुलै रोजी वरळी येथे होणार असून या अधिवेशनात प्रदेशाध्यक्षपदाच्या नावाची घोषणा होईल. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले की, चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या ३ वर्षांत प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी अतिशय समर्थपणे पेलली आहे. श्री. बावनकुळे यांनी संघटनेच्या केलेल्या बांधणीमुळेच विधानसभा निवडणुकीत पक्षाला मोठे यश मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर



बावनकुळे, ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, मुंबई भाजपा अध्यक्ष तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, ज्येष्ठ नेते भाई गिरकर, आ. सुनील कांबळे, आ. उमा खापरे, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ आदींनी श्री. चव्हाण यांच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केले. केंद्रीय अल्पसंख्याक विकास मंत्री व या निवडणुकीसाठीचे निरीक्षक किरेन रिजिजू, राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी खा. अरुण सिंह यांच्याकडे श्री. चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक अधिकारी आ. चैनसुख संचेती हेही यावेळी >> पान २

## शक्तीपीठ रत्नागिरी-नागपूर महामार्गास समांतर, तरीही ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठी या महामार्गाचा अट्टाहास; राजू शेट्टींचा मॅप दाखवत हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :** शक्तिपीठ महामार्गाला कॅबिनेट मंजुरी देण्यात आल्यानंतर राज्यांमध्ये एल्गार सुरूच आहे. शक्तिपीठ महामार्ग विरोधात शेतकरी संघटनांसह राजकीय पक्षही एकवटले आहेत. या महामार्गाला कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यासह १२ जिल्ह्यातून कडाडून विरोध सुरूच आहे. मात्र, सरकारकडून शक्तीपीठ होणारच अशी भूमिक भूमिका घेतली जात आहे. या सर्व पार्श्र्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी (१ जुलै) शेतकरी >> पान २

## बीडमधील कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थीनीचा लैंगिक छळ, आरोपींविरुद्ध कडक कार्यवाही करा; पंकजा मुंडेंकडून एसपींना सूचना

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील उमापकिरण कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करणाऱ्या आरोपी विरुद्ध कठोर आणि कडक कार्यवाही करा, अशा सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना केल्या आहेत. पंकजा मुंडे यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कौवत यांच्याशी फोनवर चर्चा करून या संपूर्ण घटनेची माहिती घेतली. ही घटना अतिशय संताप जनक आणि जिल्ह्याला काळीमा फासणारी असून शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरूपाचे असल्याचेही त्या म्हणाल्या. क्लासेसमधील शिक्षक प्रशांत खटावकर आणि विजय पवार या दोघांनी सतरा वर्षीय विद्यार्थिनीचे गेल्या वर्षापासून लैंगिक शोषण केले होते. या घटनेनंतर पंकजा मुंडे यांनी पोलीस अधीक्षकांना आरोपींना तत्काळ अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या असेही या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



>> पान २

## कमी बोला जास्त काम करा! एकनाथ शिंदेंच्या आमदारांना कानपिचक्या, म्हणाले, केलेल्या कामांची ब्रेकिंग न्यूज व्हावी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तुमचा चुकीचा शब्द पक्षाला अडचणीत आणतो. आपण एवढं मोठं यश मिळवलं ते चुकीचं बोलून घालवू नका, अशा कानपिचक्या राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांना दिल्या आहेत. कमी बोलू आणि जास्त काम करु तेवढं चांगलं असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एस्पोज होऊ नका. शिस्तीला तडा जाईल असं काही करु नका. केलेल्या कामांची ब्रेकिंग न्यूज व्हायला पाहिजे असंही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा झालीच पाहिजे शाखेचं जाळं बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेसाहेबांनी घट्ट केलं आहे. शाखा हा लोकांना आधार वाटतो. कंटेनर शाखेचा कॉन्सेप्ट ठिकठिकाणी राबवा असेही शिंदे म्हणाले.

'घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा' ही झालीच पाहिजे. निवडणुकांसाठी सज्ज व्हा, एकदिलाने काम करायचंय, निवडून येण्याची क्षमता असलेला उमेदवार हवा असे ते म्हणाले.

उमेदवार चुकला की संपलं. जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करा. नोंदणी करताना प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी उद्दिष्ट ठरवून नोंदणी करा. मराठी भाषेबाब तडजोड सहन करणार नाही. गळचेपी सहन करणार नाही. मराठी माणसाच्या उध्दारासाठी जे काही करायचं ते आपण



करणार, दिलेला शब्द आपण पाळतो त्यामुळे मराठी माणूस आपल्यासोबत असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

एकटा माणूस मोठा होऊन पक्ष मोठा होत नाही. >> पान २

# दोन भावांनी एकत्र येऊ नये असा जीआर मी काढलाय का? त्यांनी एकत्र यावं आणि क्रिकेट खेळावं : मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आम्ही निर्णय घेताना कोणत्याही पक्षाचं हित पाहणार नाही, आम्ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचं हित पाहणार. त्यामुळे कुणाच्याही दबावाखाली न येता योग्य तोच निर्णय घेऊन असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. दोन ठाकरे बंधू एकत्र येऊ नये असा काही जीआर आम्ही काढला नाही, त्यांनी एकत्र यावं आणि क्रिकेट खेळावं, जेवण करावं. आम्हाला त्याचा काही फरक पडणार नाही असंही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेसंबंधी काढण्यात आलेले जीआर राज्य शासनाने रद्द ठरवले. हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विषय असल्याचं ठाकरे बंधूंनी सांगितलं. त्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांचा उजवा हात समजल्या जाणाऱ्या नेत्याने हिंदी सक्तीची करा अशी शिफारस केली होती. तो अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला. त्यामुळे हिंदीचा निर्णय त्यांच्या कार्यकाळातच झाला होता. हे दुटप्पी लोक आहेत. याचं सत्तेतले रुप वेगळं आणि विरोधातले रुप वेगळं आहे. ठाकरेंनी एकत्र यावं, क्रिकेट खेळावं ठाकरे बंधू एकत्र न येण्यासाठी भाजप प्रयत्न करतंय का असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये म्हणून मी जीआर काढला नाही. दोन भावांना एकत्र येण्यासाठी मी रोखलंय का? त्यांनी एकत्र यावे, क्रिकेट खेळावं, टेनिस खेळावं, जेवण करावं, काहीही करावं आम्हाला काहीही फरक पडत नाही.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात त्रिभाषा सूत्र स्वीकारायचं की नाही यावर आम्ही एक समिती नेमली आहे. ती समिती आता ठरवेल. आम्ही कुठल्याही पक्षाचं हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांचं हित पाहणार.

## इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

१ जुलै हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्म दिन. त्यांच्या जन्मदिनानिमीत्त १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी साम रे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो – लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

# फडणवीस, प्रफुल्ल पटेल, शिंदे अन् हसन मुश्रीफ एकत्र येऊ शकतात, तर ठाकरे बंधू एकत्र आल्यास तुम्हाला काय पोटदुखी; राऊतांचा मुख्यमंत्र्यांवर पलटवार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शाळांमध्ये पहिली इयत्तेपासून तिसरी भाषा शिकणे अनिवार्य करण्याच्या निर्णयावरुन गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मोठा वाद सुरु होता. राज्य सरकारच्या या निर्णयावरुन मनसेप्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. या निर्णयाच्या विरोधात ठाकरे बंधूंनी ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चाचे आयोजन देखील केले होते. राज्यभरात हिंदी सक्तीवरून आणि त्रिभाषा सुत्रावरून वाद उफाळलेला असताना हिंदी सक्ती बाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही मोठी घोषणा केली. यानंतर ५ जुलै रोजी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा मोर्चा होणार नसून त्या ऐवजी विजयी मोर्चा किंवा जल्लोष सभा



घेण्यासाठी चर्चा करू, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. आता यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाष्य केले आहे.

संजय राऊत म्हणाले की, या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या काही काळातला घेतलेला शहाणपणाचा निर्णय जर कोणता असेल तर तो म्हणजे हिंदी सक्तीचा लादण्याचा निर्णय रद्द केला. महाराष्ट्राच्या मराठी माणसाच्या जनभावना त्यांनी ओळखल्या आणि बराच काळ खेळ करण्याचा प्रयत्न केला. दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळे तोडगे समोर आणले. पण, शेवटी जनता काल रस्त्यावर उतरली. राज्यभरात सरकारी अध्यादेशाची होळी झाली. काल स्वतः उद्धव ठाकरे आणि इतर सर्व घटक रस्त्यावर उतरले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित मोर्चाची घोषणा झाल्यावर सरकारने धसकाच घेतला होता. कारण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो मराठी लोक या मोर्चासाठी येणार होते. या सगळ्याचा परिणाम झाला आणि काल देवेंद्र फडणवीस सरकारला हा देश मागे घ्यावा लागला.

आता काहीतरी एक कमिटी स्थापन केली आहे. आम्ही त्रिसूत्री भाषा सूत्र स्वीकारणारच नाही. मग, तुम्ही कमिट्या वगैरे स्थापन करून कशाकरिता करत आहात. मराठी माणसाला का खेळवत आहात? कुठल्याही परिस्थितीत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि त्यातलं हे त्रिसूत्री धोरण महाराष्ट्र स्वीकारणार नाही. हे काल उद्धव ठाकरे यांनी देखील सांगितले आहे आणि राज ठाकरे यांनी देखील सांगितले आहे. आता दोन ठाकरे बंधूंनी यावर पक्का निर्णय दिल्यावर उगाचच फडणवीस सरकारने फालतू खेळ करू नये, असे त्यांनी म्हटले आहे. संजय राऊत पुढे म्हणाले की, पाच जुलैला राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे ह्हे एकत्र येणे हे महाराष्ट्रासाठी फार मोठं आकर्षण होतं. त्यामुळेच हा अध्यादेश रद्द केला आहे. पाच जुलैच्या मोर्चाची तयारी सुरू झाली. राज ठाकरेंनी त्यांच्या दोन नेत्यांची नेमणूक केली होती. आमच्याकडून सुद्धा दोन नेत्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्या दृष्टीने तयारी सुरू असताना सरकारने हा निर्णय मागे घेतला. पण, पाच जुलैच्या मोर्चाची तयारी दोन्ही बाजूंनी पूर्ण झाली आहे. आता हा मराठीचा फोर्स तयार होणार होता त्याचे काय करायचे तर त्याचे रूपांतर विजय जल्लोषात करावे, अशा भूमिका दोन्ही बाजूने आहे. काल माझे राज ठाकरे साहेबांचे बोलणे झाले. आम्ही काल चर्चा केली. आता नक्की कोणत्या पद्धतीने भूमिका घ्यावी, या संदर्भात ते मत मांडतील. उद्धव ठाकरेंनी सांगितलं की, विजयी जल्लोष होईल आणि नक्कीच तो एकत्र होईल, असेही त्यांनी म्हटले.

# मी बोटॉक्सच्या विरोधात.... शेफाली जरीवालाच्या निधनानंतर करिना कपूरचं स्टेटमेंट व्हायरल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शेफाली जरीवालाच्या मृत्यूनं लोकांना धक्का बसला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, ती अँटी-एजिंग ट्रीटमेंट घेत होती. तिच्या मृत्यूनंतर ही औषधं घ्यावीत की, नाही यावर जोरदार चर्चा झाली. दरम्यान, करीना कपूरचं वक्तव्य व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तिनं म्हटलं आहे की, ती बोटॉक्सच्या विरोधात आहे.

बरखा दत्तला दिलेल्या मुलाखतीत बोलताना करिना कपूर म्हणाली की, ''मी बोटॉक्सच्या विरोधात आहे. मी निरोगी राहण्यासाठी, चांगलं वाटण्यासाठी नैसर्गिक उपायांच्या आणि स्वसंरक्षणाच्या बाजूनं आहे. स्वसंरक्षण म्हणजे, स्वतःचं आणि तुमच्या प्रतिभेचं रक्षण करणं देखील... कारण हे माझे शस्त्र आहे.''

मित्रमंडळी आणि कुटुंबासोबत वेळ घालवा : करिना कपूर

करिना कपूर म्हणाली होती की, ''याचा अर्थ माझा स्वतःचा आणि माझ्या प्रतिभेचा बचाव करणं असा आहे, कारण ते माझं सर्वात मोठं शस्त्र आहे. सुई आणि चाकूखाली जाण्याऐवजी, स्वसंरक्षणाचा एक चांगला मार्ग म्हणजे, सुट्टी घेऊन तुमच्या मित्रांसोबत आणि कुटुंबासोबत क्वालिटी टाईम घालवा.''

लो बीपीमुळे शेफालीचा मृत्यू?

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री उशिरा शेफाली जरीवालाचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झाल्याचं वृत्त आहे. सुरुवातीच्या अहवालात, ''लो बीपी, हार्ट अटॅक आणि गॅस्ट्रिकमुळे'' तिचा मृत्यू झाल्याचं म्हटलं असलं तरी, नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. पोस्टमार्टम रिपोर्ट लवकरच जारी केला जाण्याची शक्यता आहे.

अँटी-एजिंग ट्रिटमेंट घेत होती शेफाली

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शेफाली जरीवालाच्या निधनानं संपूर्ण इंडस्ट्री हादरली आहे. शुक्रवारी रात्री उशीरा शेफालीचं हॉर्ट अटॅकनं निधन झालं. दरम्यान, अभिनेत्रीचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट अद्याप समोर आलेला नाही. रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्री गेल्या पाच वर्षांपासून अँटी-एजिंग ट्रीटमेंट घेत होती. ज्या दिवशी अभिनेत्रीचा मृत्यू झाला, त्याच दिवशी तिनं अँटी-एजिंग इंजेक्शन्स घेतली होती. पोलीस सध्या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत आहेत. आतापर्यंत सुमारे १४ जणांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत.

# महाबोधी विहाराबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, व्यवस्थापन बौद्धांकडे देण्यास

**नागपूर /प्रतिनिधी :** गौतम बुद्धांनी जिथे ज्ञानप्राप्ती केली, त्या बोधगया (बिहार) येथील महाबोधी महाविहार मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन केवळ बौद्ध धर्मीयांकडे सोपवावे, या मागणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट नकार दिला. सुलेखा कुंभारे यांनी दाखल केलेल्या याचिकेत १९४९ मधील 'बोधगया मंदिर अधिनियम' घटनाबाह्य असल्याचा दावा केला होता. सध्या या कायद्याअंतर्गत मंदिराचे व्यवस्थापन ९ सदस्यीय समितीकडे आहे.

यामध्ये ४ बौद्ध, ४ हिंदू आणि जिल्हाधिकारी (अध्यक्ष) यांचा समावेश आहे. परंतु बौद्ध समाजाचा आक्षेप आहे की, जिल्हाधिकारी बहुतेकवेळा हिंदूच असतो, त्यामुळे निर्णय प्रक्रियेत बौद्धांचे संख्यात्मक व प्रभावी प्रतिनिधित्व होत नाही. बौद्ध धर्मीयांचा आग्रह आहे की जगातील सर्वात पवित्र बौद्ध तीर्थस्थानाचे संपूर्ण नियंत्रण त्यांच्या हक्कात असावे. त्यांचे म्हणणे आहे की, अनुच्छेद २५ (धर्मस्वातंर्त्य), २६ (धार्मिक संस्थांचे व्यवस्थापन) आणि २९ (सांस्कृतिक हक्क) यांच्या अंतर्गत त्यांना हे अधिकार मिळाले पाहिजेत.

महाबोधी मंदिर हे युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित केले आहे. इ.स. पूर्व ५ व्या शतकात गौतम बुद्धांनी याच स्थळी बोधी वृक्षाखाली ध्यान करताना ज्ञानप्राप्ती केली होती. त्यानंतर या स्थळाचा बौद्ध धर्माच्या केंद्रबिंदू म्हणून विकास झाला. अनेक शतकांनी सम्राट अशोकाने येथे पहिल्या वास्तू उभारल्या. पुढे भारतात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी झाल्यानंतर मंदिरावर हिंदू ब्राह्मण पुजाऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. १९४९ साली स्वतंत्र भारतात बौद्ध समाजाने महाबोधी मंदिर पुन्हा मिळवण्यासाठी आंदोलन सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून 'बोधगया मंदिर कायदा' पारित झाला, ज्यात काही प्रमाणात बौद्धांचा समावेश करण्यात आला. परंतु आजही मंदिरात मुख्य पुजारी हिंदू ब्राह्मण असतो, आणि महत्त्वाचे निर्णय जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील समितीतूनच घेतले जातात. यामुळे ''हे केवळ बौद्ध मंदिर नसून संयुक्त व्यवस्थापनाचे ठिकाण आहे'' असा शासकीय दृष्टिकोन बनलेला आहे.

काय म्हणाले न्यायालय?

सुलेखा कुंभारे या माजी केंद्रीय मंत्र्यांनी दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली असून, त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेण्याचे स्वातंर्त्य दिले आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ही याचिका घटनादत्त अनुच्छेद ३२ अंतर्गत ऐकण्यास नकार देताना नमूद केले की, ''आम्ही याचिकेचा विचार करण्यास इच्छुक नाही, मात्र याचिकाकर्त्यास उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय खुला आहे.''

# देवा विठ्ठला काय हे! पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना लुटून नंतर अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दौंड-** आषाढी वारी हा संपूर्ण महाराष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक व आध्यात्मिक उत्सव मानला जातो. लाखो भाविक 'माऊली माऊली'चा गजर करत संतांच्या पालख्यांसोबत पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. या काळात संपूर्ण राज्यात भक्तीमय वातावरण, उत्साह आणि चैतन्याची लहर पाहायला मिळते. अनेकांना विठुरायाच्या भेटीचे वेध लागले आहेत. वारीच्या निमित्ताने संतांच्या पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या आहेत. आता या वारीतून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. पंढरपूरला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर नराधमांनी अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. यावेळी नराधमांनी या अल्पवयीन मुलीसोबत असलेल्या वारकऱ्यांच्या गळ्यावर कोयता लावून जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे समोर आले.

अज्ञातांचा शोध सुरु

पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना अडवून लुटल्याची घटना समोर आली आहे. दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली परिसरात वारकऱ्यांवर हल्ला करून लूट करण्यात आली. तसेच एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आला आहे. पंढरपूरकडे जाताना वारकरी वाटेत चहासाठी थांबले होते. त्यानंतर गाडीत बसताना दोघेजण गाडीवरून आले. या दोन जणांनी वारकऱ्यांच्या गळ्याला कोयता लावला. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलीस अज्ञातांचा शोध घेत असून या आरोपींना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

दौंड तालुका हादरला

या घटनेत घडलेली आणखी गंभीर बाब म्हणजे, आरोपींपैकी एकाने गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेत अल्पवयीन मुलीला काही अंतरावर नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. या अमानुष कृत्यामुळे दौंड तालुक्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेनंतर वारीच्या सुरक्षिततेबाबत मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. वारी म्हणजे श्रद्धेचा महापूर असताना अशा प्रकारची हिंसा आणि अत्याचार घडणं अत्यंत निंदनीय असल्याचं नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

पान १ वरून...

## भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी

उपस्थित होते. संघटन पर्वा अंतर्गत भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणीची प्रक्रिया पार पडल्यानंतर पक्षाच्या ८० संघटनात्मक जिल्हाध्यक्षांची निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यापाठोपाठ मंडल अध्यक्षांच्या निवडी झाल्या. प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय परिषद व राज्य परिषद सदस्य निवडणुकीचा कार्यक्रम २८ जून रोजी घोषित करण्यात आला. त्यानुसार ३० जुलै रोजी प्रदेशाध्यक्षपदासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली.

## शक्तीपीठ रत्नागिरी-नागपूर महामार्गास

दिनी पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर पुलाची शिरोली येथील पंचगंगा पुलावर रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनामध्ये हजर आणि संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राजू शेट्टी यांनी केलं आहे.

दरम्यान शेट्टी यांनी कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तसेच साखर कारखानदारांनी शक्तीपीठ विरोधी भूमिका स्पष्ट करावी अन्यथा काळ आपल्याला माफ करणार नाही असा इशारा दिला आहे. तुमच्या मिशीला खरकटं लागलं नसेल तर तुम्हाला सरकारला घाबरण्याची काहीच गरज नाही. निवडणुकीपूर्वी तुम्ही या संदर्भात पत्र दिले होते आणि आता तुम्ही भूमिका स्पष्ट करत नसल्याकडे राजू शेट्टी यांनी लक्ष वेधलं. राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्ग ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठीच असल्याचा आरोप केला. राजू शेट्टी यांनी पोस्ट करत म्हटलं आहे की महाराष्ट्रातील जनतेवर ८६००० कोटींचा बोजा टाकणारा शक्तीपीठ महामार्ग हा रत्नागिरी नागपूर महामार्गास समांतर आहे. या दोन्ही महामार्गातील कमीत कमी अंतर दोन किमी व जास्तीत जास्त अंतर तीस किमी आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यातून जाणारे दोन्ही महामार्ग कसे समांतर आहेत हे या नकाशावरून दिसून येईल. भविष्यात गरज पडल्या सध्या असणारा रत्नागिरी नागपूर महामार्ग चौपदरी, सहा पदरी किंवा आठ पदरीकरण सहज शक्य असताना शक्तिपीठ महामार्गाचा अट्टाहास कशासाठी? ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठीच असा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.

## बीडमधील कोचिंग क्लासेसमध्ये

दरम्यान, खासगी कोचिंग क्लासेस मध्ये 'नीट' ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणी दोन शिक्षकांवर पोस्को अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्षकांवरच गुन्हा दाखल झाल्यानं शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या मुलीकडून पोलिसांकडे देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी संत भगवान बाबा उच्च माध्यमिक महाविद्यालय खरवंडी कासार येथे ११ वीचे ॲडमीशन घेतले असुन एप्रील २०२४ मध्ये उमा किरण कोचिंग क्लासेस येथे नीटचे क्लासेस लावले होते. सकाळी ०९.०० ते १२.०० पर्यंत उज्वल अभ्यासिका येथे अभ्यासीका लावली होती व तेथे मी नेहमी अभ्यास करण्याकरीता जात असायचे.

## कमी बोला जास्त काम करा!

कार्यकर्त्याला मोठं केलं की पक्षही आपोआप मोठा होतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्यात शिवसैनिक हे पद सर्वात मोठं आहे हे लक्षात ठेवा. कार्यकर्ता हा नेता तयार करतो. पक्ष घडवतो, त्यामुळं कार्यकर्त्याला जपले पाहिजे असे एकनाथ शिंदे म्हणाले.नेता आमदार मंत्री झाला ही हवा डोक्यात जाऊ देऊ नका, कायम कार्यकर्ता म्हणूनच काम करा. शाखाप्रमुखापासून तर मुख्य नेत्यापर्यंत सर्वांनाच निवडणूकीला सामोरे जावे लागणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

पक्षाच्या सक्रीय सदस्य हेच मतदार असतील. डीजीटल म्हणजे ऑनलाईन पद्धतीने आणि प्रत्यक्ष मतदान पद्धतीने अशा ७ टप्प्यात ही निवडणूक होणार आहे. कुठेही लपवाछपवी नाही किंवा कुणाचे नेतृत्व लादण्याचा प्रयत्न होणार नाही. ही निवडणूक ऐतिहासिक होणार आहे. संपूर्ण पारदर्शक पद्धतीने, निःपक्षपाती पद्धतीने निवडणूका होतील. मुख्यनेता असलो तरी आज निवडणुकीला रीतसर सामोरं जाणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. शाखाप्रमुख असो किंवा मुख्य नेता लोकशाहीत सगळेच समान आहेत असे एकनाथ शिंदे म्हणाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आरोपीचे फोटो सर्वच नेत्यांसोबत, सुरेश धस यांच्याकडून संदीप क्षीरसागरांची पाठराखण

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये 'नीट' ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणी दोन शिक्षकांवर पोस्को अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्षकांवरच गुन्हा दाखल झाल्यानं शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून बीड शहरात हे दोघे जण खाजगी कोचिंग क्लासेस चालवतात.

विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून विजय पवार याला राजकीय पाठबळ असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तर आरोपी शिक्षक विजय पवार हा विद्यमान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचा कार्यकर्ता असून त्याचे अनेक फोटो सोशल माध्यमावर व्हायरल होत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर निशाणा साधला. तर भाजप आमदार सुरेश धस यांनी संदीप क्षीरसागर यांची पाठराखण केल्याचं दिसून येत आहे.

सुरेश धस नेमकं काय म्हणाले?

लैंगिक शोषण केल्याचा आरोप ज्याच्यावर करण्यात आला आहे, त्याच्यासोबत संदीप क्षीरसागर यांचे काही फोटो आहेत. मुळात त्याचे फोटो हे केवळ संदीप क्षीरसागरसोबत नाही, तर सगळ्या जिल्ह्यातील नेत्यांसोबत आहेत. त्यामुळे त्या सगळ्यांना आरोपी करणार का?, असा सवाल सुरेश धस यांनी उपस्थित केला.

धनंजय मुंडे काय म्हणाले?

बेल्सपाल्सी आजारामुळे धनंजय मुंडे मागील बरेच दिवस सार्वजनिक कार्यक्रमापासून दूर होते. धनंजय मुंडे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेत होते.. मात्र या दरम्यान ते भाषणांपासून दूर राहिले. परंतु आज अखेर धनंजय मुंडे यांनी आपले मौन सोडून आमदार संदीप क्षीरसागर यांची




कोंडी केली. धनंजय मुंडेंसह पंकजा मुंडे यांनी देखील या प्रकरणात आरोपींवर कडक कारवाईची मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली.

बीडचे खासदार बजरंग सोनावणे काय म्हणाले?

सदर संपूर्ण प्रकरणाचे बीड जिल्ह्यात पडसाद दिसत असून अद्याप संदीप क्षीरसागर अथवा त्यांच्या कार्यकर्त्यांनी माध्यमांना कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. परंतु राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मात्र धनंजय मुंडे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे असून आरोप करणे सोपे आहे. आरोप करताना त्याला पुरावा असणं गरजेचं आहे. दीडशे दिवस तुम्ही का गप्प बसलात? असा सवाल खासदार सोनवणे यांनी उपस्थित केला.

नेमकी काय घटना काय?

पीडित मुलीकडून पोलिसांकडे देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी संत भगवान बाबा उच्च माध्यमिक महाविद्यालय खरवंडी कासार येथे ११ वीचे अॅडमीशन घेतले असुन एप्रील २०२४ मध्ये उमा किरण कोचिंग क्लासेस येथे नीटचे क्लासेस लावले होते. सकाळी ०९.०० ते १२.०० पर्यंत उज्वल अभ्यासिका येथे अभ्यासीका लावली होती व तेथे मी नेहमी अभ्यास करण्याकरीता जात असायचे. जुलै २०२४ पासून प्रशांत खाटोकर सर १२.०० वा.सु मी अभ्यासीकेमधून बाहेर येण्याच्या टाईमला माझ्या अभ्यासीकेच्या खाली येवून थांबायचे व मला म्हणायचे तू माझ्यासोबत चल गाडीवर बस, तेव्हा मी त्याला नाही म्हणायचे. क्लासेसचा टाईम दुपारी २ ते दुपारी ६ पर्यंत असायचा. मी तेथे क्लास रेग्युलर करत होते. प्रशांत खाटोकर सर जे फिजिक्स शिकवतात ते मला क्लास संपल्यानतर तेथील केबिनमध्ये एकटीला बोलवून ते माझी कीस घ्यायचे, माझ्या छातीला व गुप्त अंगाला बॅड टच करायचे. अंगावरील कपडे काढायला लावून माझे ते फोटो काढायचे. कधी कधी ते क्लास संपल्यानंतर क्लासरुम मध्ये कोणी नसताना तिथे सुध्दा ते मला किस करायचे व छातीला व इतर अंगाला बॅड टच करायचे. ते असे माझ्यासोबत वारंवार करत असायचे. मला धमकी द्यायचे की, तू जर घरी कोणाला सांगितले तर मी तुला मारुन टाकेन, अशी धमकी प्रशांत खाटोकर यांनी आपल्याला दिल्याचे पीडित मुलीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

## बांद्यात दोन एसटी बसचा भीषण अपघात: १९ प्रवासी जखमी, सुदैवाने जीवितहानी टळली

**सावंतवाडी :** सावंतवाडी तालुक्यातील बांदा-दोडामार्ग राज्यमार्गावरील पानवळ येथे सोमवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास दोन एसटी बसमध्ये समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात चालक, वाहक आणि विद्यार्थ्यांसह एकूण १९ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना तातडीने बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघाताची भीषणता पाहता सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, फुकेरी-बांदा ही बस बांद्याच्या दिशेने पानवळ येथे येत असताना समोरून भरधाव वेगात येणाऱ्या धाराशिव-पणजी बसने तिला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, फुकेरी बसच्या चालकाच्या बाजूचा दर्शनी भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. धाराशिव-पणजी बसच्या चालकाने ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला असला तरी, वेगामुळे त्याने फुकेरी बसला काही अंतर फरपटत नेले.

या अपघातात फुकेरी बसमधील प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापती झाल्या. सर्व जखमींना तातडीने बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, तर काहींना अधिक उपचारांसाठी सावंतवाडी येथे हलवण्यात आले आहे. दोन्ही एसटी बसचे चालक आणि वाहक देखील जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.


## कोयना धरणाच्या पाणीसाठ्याची 'हाफ सेंच्युरी' ; सिंचनासह वीजनिर्मितीची चिंता मिटली

**सातारा/प्रतिनिधी :** शेतकरी आणि उद्योग क्षेत्रासाठी एक आनंदाची बातमी आहे. उद्योग क्षेत्राचा कणा असलेल्या कोयना धरणातील पाणीसाठ्याने ५० टीएमसीचा टप्पा ओलांडला आहे. धरण क्षेत्रात चांगला पाऊस होत असल्यामुळे पाणी साठा वेगानं वाढत आहे. सध्या धरणात ५१.२० टीएमसी एवढा पाणीसाठा आहे, तर धरणात प्रतिसेकंद २१ हजार २८१ क्युसेक इतकी आवक सुरू आहे. चोवीस तासात २ टीएमसीने पाणीसाठा वाढला आहे.

कोयना धरण हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे धरण असून कोयनेचा पाणीसाठा ५० ऊश्ण पर्यत पोहोचणे ही एक चांगली बातमी आहे. कोयना धरणाच्या पाणीसाठ्याची जून महिन्यातच हाफ सेंच्युरी झाली असून धरण निम्मं भरलं आहे. अजून पावसाचे दोन महिने शिल्लक आहेत. त्यामुळं सिंचन आणि वीजनिर्मितीची चिंता मिटली आहे.सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर आहे. त्यामुळं कोयना धरणात प्रति सेकंद २१,२८१ क्युसेक्स पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळं जून महिना संपण्याच्या अखेरच्या दिवशी धरणातील पाणीसाठा ५१.२० टीएमसी झाला आहे. पाण्याची आवक आणि पावसाचे शिल्लक दिवस पाहता धरण व्यवस्थापनाने महापुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

## १ जुलैपासून रेल्वेची भाडेवाढ लागू; जाणून घ्या, किती रुपयांनी महाग होणार तिकीट?

**नवी दिल्ली :** रेल्वे १ जुलै २०२५ पासून देशभरातील लांब पल्ल्याच्या गाड्यांमधील द्वितीय श्रेणीच्या प्रवाशांसाठी भाडं वाढवणार आहे. रेल्वेनं यापूर्वी २०२० मध्ये भाडं वाढवलं होतं. आता पुन्हा भाडेवाढ करण्यात आली आहे. यावेळी कमाल भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढेल, असं रेल्वेनं सांगितलं आहे.



रेल्वे मंत्रालयानं सोमवारी (३० जून) एक अधिकृत परिपत्रक जारी करून मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांमधील नॉन-एसी क्लासच्या भाड्यात १ पैसे आणि सर्व एसी क्लासच्या भाड्यात प्रति किलोमीटर २ पैसे वाढ केली आहे. यापूर्वी, मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी २४ जून रोजी प्रस्तावित भाडेवाढीचे संकेत दिले होते. तथापि, गाड्या आणि श्रेणींनुसार भाडेतालिका असलेलं अधिकृत परिपत्रक सोमवारी प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

दैनंदिन प्रवाशांच्या हितासाठी, उपनगरीय गाड्या आणि मासिक हंगामी तिकिटांच्या भाड्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच, ५०० किलोमीटरपर्यंतच्या सामान्य द्वितीय श्रेणीच्या भाड्यात कोणतीही वाढ केलेली नाही. त्याचवेळी लांब पल्ल्याच्या तिकिटांच्या किमतीत प्रति किलोमीटर ५० पैसे वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, १ जुलैपासून सामान्य स्लीपर क्लास आणि फर्स्ट क्लासमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही प्रति किलोमीटर ५० पैसे जास्त दरानं रेल्वे प्रवास करावा लागेल.

दरम्यान, भाडेवाडीबाबत मंत्रालयानं सांगितलं की, ''तेजस राजधानी, राजधानी, शताब्दी, दुरंतो, वंदे भारत, हमसफर, अमृत भारत, तेजस, महामना, गतिमान, अंत्योदय, गरीब रथ, जन शताब्दी, युवा एक्स्प्रेस, जनरल ट्रेन सर्व्हिसेस (नॉन-सबर्गन), अनुभूती कोच आणि एसी व्हिस्टाडोम कोच यांसारख्या गाड्यांच्या मूळ तिकिटांच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. ही वाढ प्रत्येक वर्गासाठी निश्चित केलेल्या नवीन भाडे यादीनुसार करण्यात आली आहे.

मंत्रालयानं असंही जाहीर केलं आहे की, ''१५ जुलै २०२५ पासून प्रवाशांना तत्काळ तिकिटं बुक करताना आधार-आधारित ओटीपी प्रमाणीकरण पूर्ण करावं लागेल. यासोबतच, उद्यापासून तत्काळ तिकिटं बुक करण्यासाठी तुमचे आयआरसीटीसी अकाउंट आधारशी लिंक करणे अनिवार्य असेल. या संदर्भात, रेल्वेनं सांगितलं की, ''यामुळे तत्काळ तिकीट बुकिंगमध्ये होणारी फसवणूक थांबण्यास मदत होईल. आयआरसीटीसी लिंक करण्यासाठी तुमचा नवीनतम मोबाईल नंबर आधारशी लिंक केलेला असणं महत्त्वाचं आहे. कारण आधार पडताळणी आणि लिंकिंगसाठी ओटीपी या क्रमांकावर येईल''.

रेल्वेनं अधिकृत बुकिंग एजंटवरही निर्बंध लादले आहेत. हे एजंट आता बुकिंग विंडोच्या पहिल्या ३० मिनिटांत तत्काळ तिकिटं बुक करू शकत नाहीत. एजंट सकाळी १० ते १०.३० वाजेपर्यंत एसी क्लाससाठी आणि नॉन-एसी क्लाससाठी सकाळी ११ ते ११.३० वाजेपर्यंतच तिकिटे बुक करू शकतील.

## ४१८२० धावा आणि ८६ शतके ठोकणाऱ्या दिग्गजाचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत-इंग्लंड कसोटी मालिकेच्या दरम्यान एक अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. तब्बल ४१८२० धावा आणि ८६ शतक झळकावणाऱ्या इंग्लंडच्या माजी क्रिकेटपटूचे निधन झाले आहे. या दिग्गज क्रिकेटपटूचे नाव वेन लार्किन असे आहे. ते एक महान फलंदाज होते. त्यांच्या जाण्याने संपूर्ण क्रिकेट विश्वात हळहळ व्यक्त केली जात आहे.वेन लार्किन हे गेल्या काही काळापासून एका गंभीर आजाराशी झुंज देत होते. त्यांनी अखेर वयाच्या ७१ वर्षी जगाचा निरोप घेतला. 'नेड' या टोपणनावाने ओळखले जाणारे लार्किन इंग्लंडसाठी १९७९ ते १९९१ दरम्यान खेळले. त्यांचा जन्म २२ नोव्हेंबर १९५३ रोजी युनायटेड किंगडममधील रॉक्सटन या लहानशा गावात झाला होता.लार्किन यांनी इंग्लंडसाठी १३ कसोटी आणि २५ एकदिवसीय सामने खेळले. कसोटीत त्यांनी २५ डावांत २०.५४ च्या सरासरीने ४९३ धावा केल्या. वनडेमध्ये त्यांनी २४ डावांत २४.६२ च्या सरासरीने ५९१ धावा जमा केल्या.

# आयसीसीकडून क्रिकेटच्या ६ नियमांमध्ये बदल

**नवी दिल्ली :** आयसीसीने क्रिकेटच्या नियमांमध्ये काही बदल केले आहे . हे नियम कसोटी, एकदिवसीय आणि टी २० क्रिकेटसाठी आहेत. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपलाही हे नियम लागू होणार आहेत. आयसीसीनं कॅचच्या नियमांमध्ये देखील बदल केले आहेत. जर कॅच आऊटच्या रिव्यूमध्ये तो चुकीचा ठरल्यास आणि बॉल पॅडवर लागल्यास टीव्ही अम्पायर एलीबीडब्ल्यू फलंदाज आऊट आहे का ते पाहतील. हा नियम कसोटी, टी २० आणि वनडे मध्ये लागू असेल. आयसीसीनं कसोटी, वनडे आणि टी २० क्रिकेटमधील शॉर्ट रनचा नियम बदलला आहे. जाणीवपूर्वक शॉर्ट रन घेतल्यास पहिल्यांदा ५ धावांचा दंड लावला जायचा. आता फलंदाजानं अतिरिक्त रन घेण्यासाठी जाणीवपूर्वक पहिली रन पूर्ण न केल्यास फील्डिंग करणाऱ्या संघाला स्ट्राइकवर कोणता खेळाडू पाहिजे असं विचारतील, आणि त्यांनी सांगितलेल्या खेळाडुला स्ट्राइकवर घेतले जाईल . ५ धावांचा नियम देखील लागू असेल , त्यात बदल नाही . एखाद्या गोलंदाजानं चुकून चेंडूला लाळ लावली म्हणून चेंडू बदलता येणार नाही. चुकून लाळ लावल्यास चेंडू बदलणे अनिवार्य नसेल. चेंडूच्या रचनेत बदल झाल्यास किंवा चेंडू खूप ओला झाल्यानं त्याच्यावरील चमक वाढल्यास अम्पायर चेंडू बदलण्याचा निर्णय घेऊ शकतात. चेंडू बदलण्याचा निर्णय घेणं हे पंचांवर अवलंबून असेल. चेंडूत फार बदल झाला नसेल तर तर तो बदलला जाणार नाही. हे नियम कसोटी, वनडे आणि टी २० क्रिकेटसाठी लागू असतील . आयसीसीनं कसोटी क्रिकेटमध्ये स्टॉप क्लॉक नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नियमानुसार कसोटी क्रिकेटमध्ये फील्डिंग करणाऱ्या टीमनं ६० सेकंदापेक्षा जास्त वेळ ओव्हर सुरु करण्यास लावल्यास पहिल्यांदा दोन वेळा वॉर्निंग दिली जाईल . त्यानंतर नियमाचे पालन न केल्यास त्या संघाच्या ५ धावा वजा केल्या जाणार आहेत. टी २० क्रिकेट आणि वनडे क्रिकेटमध्ये हा नियम एक वर्षापासून लागू आहे. पंचांनी सॉफ्ट सिग्नल रिव्यू घेतल्यास आणि नो बॉलवर कॅच योग्य असल्यास फलंदाजी करणाऱ्या टीमला नो बॉलची एक रन अतिरिक्त मिळेल. कॅच योग्य नसल्यास नो बॉलची एक रन आणि फलंदाज जितक्या रन धावतील त्यांना त्या धावा मिळतील. पहिल्यांदा कॅचसंदर्भात संशय असल्यास मैदानावरील पंच थर्ड अम्पायरकडे दाद मागायचे. त्यावेळी टीव्ही अम्पायर नो बॉल होता की नव्हता हे सांगायचे, कॅचची तपासणी करत नव्हते. आता त्याची तपासणी केली जाईल. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० मध्ये हा नियम लागू असेल. आयसीसीनं टी २० क्रिकेटमधील पॉवरप्लेच्या नियमांमध्ये बदल केले आहेत. हे नियम जुलैपासून लागू होणार आहेत. पाऊस किंवा अन्य कारणांमुळं मॅचमधील ओव्हर कमी केल्यास पॉवरप्लेच्या ओव्हर देखील कमी केल्या जाणार आहे.

## संक्षिप्त...

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या अर्थसहाय्य योजनांचा लाभ घ्या ; जिल्हा व्यवस्थापकांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय अनुदान योजना तसेच बीजभांडवल योजनेंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक मिलिंद धांडे यांनी केले आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय अनुदान योजना तसेच बीजभांडवल योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता या योजनांअंतर्गत अनुक्रमे ९० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट असून, एकूण ४५ लाख रुपये अनुदान तर बीजभांडवल योजनेसाठी १ कोटी ८० लाख रुपयांची आर्थिक तरतूद उपलब्ध झाली आहे.

अनुदान योजनेंतर्गत लाभार्थ्यांना विविध बँकांच्या माध्यमातून ५० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य देण्याची तरतूद असून त्यापैकी २५ हजार रुपये इतके थेट अनुदान देण्यात येते. बीजभांडवल योजनेंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामध्ये ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान व नियमानुसार बीजभांडवल देण्यात येते.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपली कर्ज मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलडाणा येथील महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात त्वरीत सादर करावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक मिलिंद धांडे यांनी केले आहे.

### रोहितचा निर्णय ठरला टर्निंग पॉईंट



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** टीम इंडियाने आजच्याच दिवशी २९ जूनला टी२० वर्ल्ड कप जिंकला होता. रोहित शर्माच्या नेतृत्वात भारताने ही कामगिरी करून दाखवली होती. या घटनेला आता वर्ष पुर्ण झाले आहेत. या वर्षपुर्तीनिमित्त एक फोटो प्रचंड व्हायरल होत आहे.या फोटोसह रोहित शर्माने घेतलेल्या त्या निर्णयामुळे अख्खी मॅच फिरली होती. आणि टीम इंडियाने टी२० वर्ल्डकपवर नाव कोरले होते.त्यामुळे आता टीम इंडियाला वर्ल्ड कप जिंकून देणाऱ्या त्या फोटोमागची नेमकी स्टोरी काय आहे? हे जाणून घेऊयात.

भारताला टी२० वर्ल्ड कप जिंकलेल्याला वर्षपुर्ती झाल्यानिमित्त बीसीसीआयने एक व्हिडिओ शेअर केला आहे.या व्हिडिओत टीम इंडियाने वर्ल्ड कप जिंकल्यानंतर कशाप्रकारे सेलिब्रेशन केले होते, या सर्व गोष्टी शेअर केल्या आहेत.ज्यामुळे वर्ल्ड कप जिंकल्याच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत.यासोबत टीम इंडियाच्या खेळाडूंनी देखील सोशल मीडियावर विजयाच्या पोस्ट शेअर केल्या होत्या. या पोस्ट दरम्यान एक फोटो प्रचंड व्हायरल होत आहे.हा फोटोच वर्ल्ड कपमध्ये टर्निंग पॉईंट ठरलेला.

भारताने प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेसमोर १७७ धावांचे लक्ष्य ठेवलं होतं. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने पॉवर प्लेमध्ये दोन विकेट गमावले होते. त्यानंतर ट्रिस्टन स्टब्स आणि क्विंटन डी कॉक यांनी ५८ धावांची पार्टनरशीप केली.

### शुभमन गिलला ३ वर्षे कर्णधारपदी कायम ठेवा : रवी शास्त्री

**लंडन :** भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलला पाठिंबा दिला आहे. इंग्लंडमध्ये भारताने मालिका गमावली तरी शुभमन गिलला कर्णधारपदी कायम ठेवावे अशी विनंती शास्त्री यांनी संघ व्यवस्थापनाला केली आहे. रोहित शर्माने कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर गिलला ही जबाबदारी देण्यात आली होती. कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात गिलला पराभवाचा सामना करावा लागला होता.

शुभमन गिलने त्याच्या कर्णधारपदाच्या पदार्पणात शतक झळकावले आणि कर्णधार म्हणून त्याच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकावणारा तो पाचवा भारतीय क्रिकेटपटू ठरला होता. पण त्याचे कर्णधारपदाचे पदार्पण त्याच्यासाठी संस्मरणीय राहिले नाही. कारण इंग्लंडने पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा ५ विकेट्सने पराभव केला. भारताच्या पराभवानंतरही शास्त्री यांनी गिलचे कौतुक केले आहे आणि संघ व्यवस्थापनाला गिलला तीन वर्षे कर्णधारपदी कायम ठेवण्याचे आवाहन केले आहे.

रवी शास्त्री म्हणाले की, गिल खूप परिपक्क झाला आहे. तो ज्या पद्धतीने मीडियाशी वागतो. पत्रकार परिषदेत, टॉसच्या वेळी ज्या पद्धतीने बोलतो, त्यामुळे तो खूप परिपक्क झाला आहे. त्याला तीन वर्षे कर्णधार राहू द्या. मालिकेत काहीही झाले तरी काही फरक पडत नाही.

# ढगफुटीने शेतीच नव्हे तर आयुष्य उद्ध्वस्त केले

## तालुक्यातील वागदेव येथील शेती तब्बल चार फूट खरडली : नागरिकांच्या स्वप्नाचा चुराडा

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यात गत आठ दिवसापूर्वी झालेल्या ढगफुटी सदृश्यने शेत शिवार खरडून गेला. धो धो पडलेल्या पावसाने शेता बरोबरच डोळ्यातही पाणी आणले. पूर्ण शेतीशिवाय खरडून गेले. त्याच बरोबर ढगफुटीने आयुष्यही उध्वस्त केले. मोती पिकवणारे शेती पूर्णता खरडून गेल्याने शेतीला वाळवंटाचे रूप आले. असे विदारक चित्र तालुक्यातील वागदेव शेत शिवारात दिसून आले. ढगफुटी ने या नागरिका वागदेव गावातील नागरिकांची शेतीच खरडून गेली नाही तर पूर्ण आयुष्य उध्वस्त करून गेले. स्वप्नाचा चुराडा झाला. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकरी वर्गांनी मायबाप शासनाने भरीव मदत द्यावी, शेतामध्ये माती टाकण्याचीही व्यवस्था करावी, अशी मागणी दैनिक आपला विदर्भशी बोलताना नागरिकांनी केली.

मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, तालुक्यात २५ जून व २६ जून दरम्यान दगफुटी सदृश्यने.गेल्या पन्नास वर्षात सर्वात मोठा पाऊस यावर्षी अवघ्या १८ ते २० तासात झाला. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. पेरणी केलेली पिके जमिनी खरडून गेल्या. तर पेरणी राहिलेली शेती ही पुन्हा पेरण्याचे कामच राहिले नाही, असे विदारक चित्र या परिसरात दिसून आले आहे.तालुक्यातील वागदेव शेत शिवारात दैनिक आपल्या विदर्भ टीमने प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता व शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या असत्या मन सून्न करणाऱ्या या व्यथाने शेतकऱ्यांचे शेत शिवारच घडवून गेले नव्हे तर संपूर्ण आयुष्यच उध्वस्त केले. असा प्रकार दिसून आला आहे.

ढगफुटी पाण्याने नदीनाले एकत्र होऊन तुडुंब वाहले.शेत शिवारात सर्वत्र पाणीच पाणी झाले.एवढेच नव्हे तर अडीच ते तीन फूट शेती खरडून गेली आहे. अडीच फूट खोल केलेल्या पाईप लाईन जमिनीकडून खरडून गेल्याने उघड्या पडल्या आहेत. शेत शिवारातील सुपीक माती वाहून गेली असून शे त शिवाराला वाळवंटाचे रूप आले आहे. तब्बल अडीच ते तीन फूट जमीन खरडून गेल्याने पुढील पाच वर्ष या जमिनीमध्ये कोणतेही उत्पादन होण्याची शक्यता नसल्याची माहितीही शेतकऱ्यांनी दिली आहे.





त्याचबरोबर शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कट्ट्यामुळे ही वागदेव शेत शिवारातील जमिनीचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग पुरता उध्वस्त झाला असून मायबाप शासनाने शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी, त्याचबरोबर शेतामध्ये गाळ टाकण्यासाठी सुद्धा आर्थिक मदत करावी, अशी मागणी महादेव वागदेव येथील सुभाषचंद लालचंद बेगानी, अनिल बेगानी, भास्कर वागदेव, रामेश्वर लठाड, सरपंच सिताराम लठाड यांनी केली आहे. त्याचबरोबर गावात येण्यासाठी रस्ता सुद्धा नसल्याने शासनाने रस्त्याची व्यवस्था करावी, अनेक दिवसांपासून सुरू असलेले काम तात्काळ पूर्ण करावे, पाण्याची सुविधा करावी, विद्युत पुरवठा पूर्णवेळ करावा अशा मागण्याही शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

## विविध वृत्त...

### बुलडाणा येथील मागासवर्गीय शासकीय वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरु ; ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वसतीगृह, बुलडाणा येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वसतीगृहात उपलब्ध असलेल्या रिक्त जागांसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org. या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन भरावेत. अर्ज भरल्यानंतर तो पोर्टलवरून डाउनलोड करून त्याची प्रिंट घेऊन संबंधित वसतीगृह कार्यालयात ऑफलाईन सादर करणे आवश्यक आहे.

या प्रक्रियेत कनिष्ठ महाविद्यालयीन, बिगर व्यवसायिक तसेच व्यवसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन वसतीगृहाचे गृहपाल एस. ई. गारमोडे यांनी केले आहे.

### प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता मिळणार शेतकऱ्यांनो, ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचा लाभ जुलै, २०२५ मध्ये वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार ३९६ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ५३४ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

### पुणे जिल्ह्यात 'जल जीवन मिशन'ची यशस्वी वाटचाल

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यासाठी एक आनंदाची बातमी आहे! 'हर घर जल' अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यातील सुमारे चार लाख कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. यामुळे जिल्ह्यातील ३०० गावे आता 'हर घर जल' योजनेखाली आली आहेत.

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'जल जीवन मिशन' योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्याने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या मिशनमुळे पुणे जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ५ हजार कुटुंबांच्या घरात नळ जोडण्या मिळाल्या आहेत, ज्यामुळे त्यांना पिण्याचे शुद्ध पाणी थेट नळाद्वारे उपलब्ध झाले आहे. जिल्ह्यातील

## सवड येथील अवैध दारू कायम स्वरुपी बंद करा...!; महिलांचा दारूबंदीसाठी पोलीस ठाण्यात ठिय्या



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील सवड येथील हरी बबन कासार हा व्यक्ती बिनधास्तपणे सवड गावात अवैधरित्या दारू विकतो, या दारूच्या आहारी लोक जात असून या दारूमुळे घरगुती कटकटी वाढलेले आहेत. या दारूच्या आहारी तरुण मुले जात असून अनेक घरे उद्ध्वस्त व्होण्याच्या मार्गावर आहेत. सदर व्यक्ती हा कोणाची ऐकत नाही, यामुळे या व्यक्तीची दारू विक्री बंद करा. या मागणीसाठी सवड येथील महिनला ३० जुन रोजी रिसोड पोलीस स्टेशनला धडकल्या व या ठिकाणी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांना निवेदन सादर दिले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गावात दारु चालु असल्या कारणाने तरुण व नागरीक दिवस रात्र नशेत राहतात. त्यामुळे अनेक कुंटुब उध्वस्त होत आहेत व गावात भांडणे तंटा वाढला असल्याने गावात अशांतता पसरली आहे. महिलाना विनाकारण त्रास होत असल्याने मुला बाळाचे शैक्षणिक,आर्थीक सामाजीक संतुलन बिघडले आहे. तरी सदर अवैध दारु बंद करुन करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे महिलांच्यावतीने करण्यात आली आहे.

### लाडक्या बहिणींसाठी गुड न्यूज, जून महिन्याचे १५०० रुपये लवकरच खात्यात येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जून महिन्याचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात कधी जमा होणार याची माहिती दिली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी या योजनेच्या जूनच्या हप्त्यासंदर्भात अधिकृत माहिती दिली.

## जिल्ह्यात आज अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस; २५ हजार नागरिकांना योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या आर्थिक सेवा विभागाच्या निर्देशानुसार १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान वित्तीय समावेशन मोहीम जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत १ जुलै रोजी अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. समाजातील वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये सामावून घेणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार या दिवशी जिल्ह्यातील २५ हजार नागरिकांचे अटल पेन्शन योजनेंअंतर्गत नोंदणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व बँक शाखांना प्रत्येकी १०० अटल पेन्शन योजना नोंदणीचे उद्दिष्ट, तर सर्व बँकिंग प्रतिनिधींना प्रत्येकी २५ नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

अटल पेन्शन योजना ही केंद्र शासनाची योजना असून, १८ ते ४० वयोगटातील सर्व नागरिकांसाठी खुली आहे. या योजनेअंतर्गत नियमित मासिक प्रीमियम भरल्यास वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर निश्चित मासिक पेन्शन दिली जाते.जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १ जुलै रोजी आपल्या जवळच्या बँक शाखा किंवा बीसी केंद्रावर जाऊन अटल पेन्शन योजना साठी नोंदणी करावी आणि वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षिततेचा आधार मिळवावा. तसेच या उपक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक यांनी केले आहे.

## मेहकर-लोणार तालुक्यात ढगफुटी सदृश पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

### ॲड.जयश्री शेळके यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी; शासनाकडे तातडीच्या मदतीची मागणी



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** चार दिवसांपूर्वी मेहकर तालुक्यात ढगफुटी सदृश मुसळधार पावसाने थैमान घातले. मेहकर व लोणार तालुक्यातील अनेक गावांमध्ये पेरण्या उलटल्या असून, जमिनी खरडून गेल्या आहेत. मागील ३४ वर्षांमध्ये एवढ्या प्रमाणात पाऊस झालेला नव्हता, असे जुनी जाणकार मंडळी सांगतात. आज ॲड. जयश्री शेळके यांनी मेहकर तालुक्यातील कल्याणा मंडळातील बार्हई शिवारात काही नुकसानग्रस्त शेतांची प्रत्यक्ष पाहणी केली.

सामान्यतः ६५ मिलिमीटरहून अधिक पाऊस अतिवृष्टीत गणला जातो, मात्र या दोन तालुक्यांमध्ये कमाल १९३ मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे. यामुळे सोयाबीन, मूग, उडीद, तूर, हळद तसेच भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, मेहकर तालुक्यातील सुमारे २३ हजार हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीने बाधित झाले असून, सुमारे ४८ हजार शेतकरी अडचणीत सापडले आहेत. विशेषत: मेहकर तालुक्यात दीड हजार हेक्टरवर झालेल्या सोयाबीनच्या पेरण्या पाण्याखाली गेल्या आहेत.

पाहणीदरम्यान ॲड. शेळके यांनी मा. उपविभागीय अधिकारी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून, मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे तातडीने करावेत, अशी मागणी केली. तसेच, पंचनामे करताना शेतकरी बांधवांचे सोलर पॅनल, ठिबक व स्प्रिंकलर पाईप यांचे नुकसान झाल्यास त्याचाही तपशील नोंदवावा, आणि शासनामार्फत तातडीची मदत शेतकऱ्यांना पुन्हा पेरणीसाठी द्यावी, अशी विनंती केली. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. पिके उध्वस्त झाली असून, शेतकऱ्यांवर पुन्हा पेरणीचे मोठे आर्थिक ओझे येणार आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या हाकेला प्रतिसाद देत तातडीने पंचनामे पूर्ण करून योग्य ती नुकसानभरपाई व मदत जाहीर करावी, अशी ठाम अपेक्षा ॲड.जयश्री शेळके यांनी व्यक्त केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख आशिषभाऊ रहाटे, मा.सरपंच शरद पागोरे, माधवराव पागोरे, प्रशांत पागोरे, वैभव पागोरे, सुरेश पागोरे, वसंतराव पागोरे, प्रदिप पागोरे, तुषार पागोरे, कडुबा पागोरे, विश्वनाथ पागोरे, रुपराव पागोरे, अरविंद पागोरे, देवेश पागोरे, महेश पागोरे, गजानन पागोरे, सतिश पागोरे, सुभाष पागोरे, श्रेयस पागोरे तसेच गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव व राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यात बैठक

## लोणार आणि मेहकर तालुक्यातील अतिवृष्टीबाधीतांच्या मदती संदर्भात झाली चर्चा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे लोणार आणि मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत देण्यासंदर्भात आज मुंबई येथे केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव आणि महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्यात बैठक झाली या बैठकीत महसुल मंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात सकारात्मकता दर्शविली आहे.

२६ जुन रोजी बुलढाणा जिल्हयातील लोणार आणि मेहकर तालुक्यात ढगफूटी सदृष्य पाऊस पडला. या दोन्ही तालुक्यात शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पावसाच्या पाण्यासोबत खरडुन गेल्या. शेतजमिनीत वाळुचे व दगडाचे ढिग साचल्या गेले. २७ जुन ला केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांना या संदर्भाची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी २८ व २९ जुन ला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अतिवृष्टीने बाधीत झालेल्या क्षेत्राचा दौरा केला होता. त्यानंतर ३० जुन ला केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव हे मुंबई दौऱ्यावर असतांना त्यांची मंत्रालयात राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीमध्ये केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती महसुल मंत्र्यांना दिली. सोबतच अतिवृष्टीने बाधीत क्षेत्राचे छायाचित्र महसुल मंत्र्यांना दाखवुन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची दाहकता त्यांच्या निदर्शनास आणुन दिली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने भरघोस मदत देण्यासंदर्भात यावेळी चर्चा झाली. केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव हे बाधीत क्षेत्राच्या दौऱ्यावर असतांनाच झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार जिल्हा प्रशासन अहवाल तयार करत आहेत. आज केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे




महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बैठकीनंतर मंत्रालय स्तरावरुनही तात्काळ अहवाल शासनाला सादर करण्याचे सुचित करण्यात आले आहे.